# बोदवडची निधी विद्यापीठात तृतीय

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड  मधील बी.एस्सी. संगणक विद्याशाखेतील विद्यार्थिनी कु. निधी अग्रवाल, हिने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने घोषित केलेल्या विशेष प्रविण्यप्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीत संपूर्ण विद्यापीठातून तृतीय आलेली आहे.

कु. निधी अग्रवाल हिने प्राप्त केलेल्या यशाबाबत तिचा गुणगौरव सोहळा व सत्कार सोहळा दि. १९ डिसेंबर रोजी महाविद्यालयात संस्थेचे अध्यक्ष श्री. मिठूलालजी अग्रवाल, सचिव विकासजी कोटेचा यांच्या उपस्थितीत मुक्ताईनगरचे प्राचार्य डॉ. व्ही.आर. पाटील यांच्याहस्ते करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद चौधरी, उपप्राचार्य डी. एस. पाटील, संगणक विभागातील प्रा. विशाल जोशी, सौ. देशमुख, सौ. जाधव, श्री. परदेशी इ. उपस्थित होते.





